जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५३८ दिनांक - १९/१२/२०२४**

आंबेगाव पोलीस स्टेशन, पुणे शहर

## पिस्टल बाळगणा-या इसमास आंबेगाव पोलीसांनी केले जेरबंद

आंबेगाव पोलीस स्टेशनचे हददीत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शरद झिने यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.निरीक्षक प्रियंका गोरे हे तपास पथकासह दत्तनगर परीसरात गस्त करीत असताना पोलीस अंमलदार धनाजी धोत्रे व निलेश जमदाडे यांना खास बातमीदामार्फत माहिती मिळाली की, आई श्री व्हीला अपार्टमेंटचे बाजुला एका गाईच्या गोठ्यामध्ये एक इसम अंगात काळ्या रंगाचा गोल गळयाचा टी शर्ट व काळी ट्रक पॅन्ट, अंगाने मजबुत असलेल्या इसमाकडे पिस्टल आहे.

वरील बातमीप्रमाणे माहिती मिळताच सदर ठिकाणी सापळा रचण्यात आला. काही वेळातच बातमी प्रमाणे सदर ठिकाणी वरिल वर्णनाचा एक इसम मिळुन आल्याने त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्यांने त्यांचे नाव -
**१) आर्यन बापू बेलदरे, वय १९ वर्षे, काम शिक्षण, रा. आई श्री व्हीला अर्पाटमेंन्ट, फलॅट नंबर ३०४, तिसरा मजला, स्मा शन भुमी समोर, आंबेगाव ब्रु, पुणे.असे सांगितलेने** सदर इसमांची अंगझडती घेता त्याचे ताब्यात एकुण ४०,१००/- रु.किं.चा एक पिस्टल व एक जिवंत राउंडसह अनाधिकाराने, बेकायदेशीररित्या गुन्हा करण्याचे उद्देशाने विक्री करीता बाळगल्याने मिळुन आले आहे. म्हणुन त्यांचे विरुध्द भारती विद्यापीठ पो स्टे, गुन्हा रजि नं. १०५७/२०२४ भारतीय हत्याराचा अधिनियम कलम ३ सह २५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) सह १३५, अन्वये गुन्हा दाखल केला असुन नमुद इसमास दाखल गुन्ह्यात अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशीक विभाग पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२ पुणे शहर,श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री. राहुल आवारे, यांचे मार्गदर्शनाखाली आंबेगाव पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शरद झिने, सहा.पो.निरीक्षक प्रियंका गोरे, पोलीस अंमलदार शैलेंद्र साठे, हनमंत मासाळ, निलेश जमदाडे, धनाजी धोत्रे, प्रमोद भोसले, योगेश जगदाळे, विनायक पाडळे यांचे पथकाने केली.


आंबेगाव पोलीस स्टेशन
पोलीस आयुक्तालय, पुणे शहर
CONTROL ROOM
02026122880
8975283100
@PuneCityPolice
DIAL 112
@PunePoliceCity
पुणे पोलीस
पुणे पोलीस
Pune Police
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
आंबेगाव पोलीस स्टेशन